**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १९८ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.देवराव उ. पाचुरकर,
सर्वोदय कॉलनी, कॉंगेसनगर रोड,
अमरावती, जि.अमरावती.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग,
धारणी, ता.धारणी, जि.अमरावती

**२**. जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग,
धारणी, ता.धारणी, जि.अमरावती

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.देवराव उ. पाचुरकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, अमरावती श्री.एस.ए.राऊत हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, धारणी श्री.डी.डब्ल्यु. डेहनकर हे हजर आहेत.

अर्जदाराला २१/०१/२०१० रोजी माहिती देवुन अर्जदाराने माहिती प्राप्त झाल्याबद्दल पोच दिली व तक्रार राहिली नाही असे म्हटले आहे. परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार दिनांक १९/०१/२०१० रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याबाबत अर्जदाराला माहिती अर्धवट दिल्याबाबतचा अभिप्राय व माहिती अर्धवट देणे ही बाब गंभीर असल्याचे म्हटले आहे. त्याबाबत सध्या हजर असलेले जन माहिती अधिकारी हे काहीही सांगु शकले नाही. कारण त्यावेळी श्री.नगराळे हे कार्यरत होते.

तरी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशाचे अवलोकन केले असता मुद्दा क्र. १,२,४,५,७,८ व ९ ची माहिती प्राप्त झाली नसल्याचे दिसुन आले असे म्हटले आहे व त्याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा आक्षेप नोंदविला आहे.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचा अर्ज माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) नुसार निकाली न काढल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे श्री.नगराळे यांना दोषी ठरविण्यात येवुन त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमाचा भंग केल्याच्या कारणावरुन शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. तरी, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, अमरावती यांनी संबंधित उपअभियंता श्री.नगराळे यांचे विरुध्द त्यांना लागु असलेल्या सेवा विषयक नियमानुसार कार्यवाही करुन हया आयोगास तसा अहवाल सादर करावा. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार हयाबाबत श्री.कांबळे, शाखा अभियंता हे जबाबदार आहेत परंतु हयाबाबत तसे लेखी कुठलेही कागदपत्रे किंवा निवेदन हया अयोगासमोर दाखल केले नाही. तरी कार्यकारी अभियंता यांनी हया बाबत जबाबदारी निश्चित करुन १ महिण्याचे आंत जर ते दोषी असल्यास त्यांचे विरुध्द सुध्दा शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस केली असे गृहित धरावे. कारण या अधिनियमाच्या कलम ५ (५) नुसार जे अधिकारी / कर्मचारी जबाबदार असतील त्यांना सुध्दा

दोषी ठरविण्यात येते.  तरी कार्यकारी अभियंता यांनी कागदपत्रांची तपासणी करुन जबाबदारी निश्चित करुन तसे लेखी पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी  यांना पुढिल कार्यवाही करीता पाठवावे.

खालील आदेश पारीत करुन सदरचे अपिली निकाली काढण्यात येते.

**आदेश**

मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, अमरावती यांनी संबंधित कार्यरत उपअभियंता श्री.नगराळे यांचे विरुध्द या अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे त्यांना लागु असलेल्या सेवा विषयक नियमानुसार कार्यवाही  करुन हया आयोगास तसा अहवाल सादर करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, अमरावती

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १९९ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.संतोष देविदास इंगळे,
मु.सायखेड, पो. लोहगड,
ता.बार्शीटाकळी, जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
बार्शीटाकळी, जि.अकोला.

**२.** जन माहिती अधिकारी तथा
सचिव, गटग्रामपंचायत, चोहोगांव, मु.सायखेड,
पो.लोहगड, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शीटाकळी श्री.बि.डब्ल्यु. चव्हाण हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, चोहोगांव श्री.एस.बी. डाखोरे हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक १८/०२/२०१० रोजी हया आयोगासमोर व्दितीय अपिल कलम १९(३) नुसार दाखल केले व त्यात माहिती देण्यास टाळाटाळ असे म्हटले आहे. आज रोजी सदर प्रकरणात सुनावणी घेत असतांना अर्जदार गैरहजर आहेत. परंतु प्रथम अपिल अधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.बि.डब्ल्यु. चव्हाण हे हजर आहेत. तत्कालीन सचिव, ग्रा.पं. चोहोगांव श्री.आर.आर. देशमुख हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे सांगण्यात आले की, सदर प्रकरणात सचिव हे निलंबित आहेत. त्यांचेवर वेगवेगळया प्रकारचे आरोप लावण्यात आले आहे. तसेच संबंधित सचिव हे सध्या निलंबित असुन ते तेल्हारा येथे कार्यरत असुन त्यांना दिनांक २०/११/२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली व त्याकरिता हजर रहावयाचे आहे असे अवगत करण्यात आले होते.

सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०/०२/२०१० रोजी आदेश पारीत करुन दिनांक ११/०२/२०१० ला निर्गमित करण्यात आला त्यानुसार मागणी केल्याप्रमाणे मुद्दा क्र.३ मधिल काही माहिती ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसंबंधी असल्यामुळे त्यांचेकडे माहिती अधिकारात वेगळाने मागणी करण्याबाबत आदेशीत करण्यात आले व उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसाचे आत देण्याबाबत आदेशीत करण्यात आले. अपिलीय अधिकारी यांचे तर्फे असे सांगण्यात आले की, अजुनपर्यंत माहिती देण्यात आली नाही.

तरी, वरील बाबींचा विचार करता संबंधित जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी अर्जदाराचा अर्ज प्रपत्र अ दिनांक ०९/१२/२००९ या अधिनियमाच्या कलम ७(१) नुसार निकाली न काढल्यामुळे दोषी ठरविण्यात येवुन त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमाचा भंग केल्याच्या कारणावरुन शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येते. तसेच गटविकास अधिकारी यांनी संबंधित सचिव यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार कार्यवाही करुन ३ महिन्याच्या आंत अहवाल सादर करावा.

सध्या कार्यरत असलेले सचिव श्री.डाखोरे यांना असा आदेश देण्यात येते की त्यांचेकडे अर्जदाराच्या अर्जानुसार उपलब्ध असलेली माहिती आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसात अर्जदाराला विनाशुल्क पुरविण्यात यावी.

खालील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. गटविकास अधिकारी, बार्शीटाकळी यांनी संबंधित सचिव यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमानुसार कार्यवाही करुन ३ महिन्याच्या आंत अहवाल सादर करावा.

२. सध्या कार्यरत असलेले सचिव, ग्रा.पं. चोहोगांव श्री.डाखोरे यांनी आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसात अर्जदाराला माहिती विनाशुल्क अर्जदाराच्या पत्त्यावर पंजीबध्द डाकेने पाठवावी.

वरील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २०० / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.भगवान पिराजी गायकवाड
मु.पो. तांदळी शेवई,
ता.जि. वाशीम.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, वाशिम, जि.वाशिम.

**२.**जन माहिती अधिकारी तथा
कृषी विस्तार अधिकारी,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, वाशिम, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कृषी विस्तार अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वाशिम श्री.जि.ए. राठोड हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक १७/०२/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केल्यानंतर दिनांक १२/०५/२०१० रोजी अर्जदाराला माहिती देण्यात आली व त्यानुसार अर्जदाराचाी पोच घेण्यात आलेली आहे. पोच ची प्रत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम यांना दिलेली असुन रेकॉर्डवर दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे आज अर्जदार गैरहजर राहीले असावे असा निष्कर्ष काढण्यात येवुन सदरचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २०१ / २०१०**
**अपिल क्र. २०१ (अ)/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अपिलकर्ता**
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती,
दिग्रस, ता.दिग्रस, जि.यवतमाळ
**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ,
जि.यवतमाळ.
**२. मुळ अर्जदार**
श्री.अशोक प्रल्हाद ठाकरे,
मु.पो. तुपटाकळी, ता.दिग्रस,
जि.यवतमाळ

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**
**-निर्णय-**

मुळ अर्जदार तथा अपिलार्थी हे श्री.अशोक प्रल्हाद ठाकरे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ श्रीमती ए.एस. माळवे हया हजर आहेत. अपिलकर्ता तर्फे जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, दिग्रस श्री.राजकुमार बाबाराव ठाकरे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात मुळ अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार दि.११/११/२००९ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, दिग्रस, जि.यवतमाळ यांचेकडे अर्ज करुन १३ मुद्दयांत माहिती मागितली. सदर माहिती ही व्यक्तीशः मागितली होती व माहिती तयार झाल्यानंतर खर्चाबाबत पत्राने कळविल्यानंतर नियमानुसार शुल्क भरण्यास तयार आहे असे पत्रात म्हटले आहे. त्यानंतर अर्जदाराला माहिती न मिळाल्यामुळे प्रपत्र ब नुसार व या अधिनियमाच्या कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी सुनावणी घेवुन दिनांक ११/०१/२०१० रोजी आदेश पारित केला व त्यामध्ये मुळ अपिलकर्ता यांना उत्तरार्थी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली वांछित व विहीत माहिती परिपुर्ण व सत्य स्वरुपात विहीत कालावधीत पुरवावी. प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थीती लक्षात घेता खर्चासंबंधी आदेश केला नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय देतांना असे म्हटले आहे की, बाजार समिती ही संस्थापित मंडळी आहे. तिचे एकव्यक्तीभुत संस्था असे स्वरुपआहे व सन १९८४ च्या सुधारणा कायदयानुसार तिला स्थानिक स्वराज्य संस्था लोकल बॉडी असे म्हटले आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) नुसार सदरची संस्था ही पब्लिक ॲथॉरीटी या संज्ञेत मोडत असल्यामुळे सदर संस्थेला माहिती अधिकाराच्या तरतुदी लागु होतात म्हणुन कृषी उत्पन्न बाजार समिती यांना निर्देश देणे क्रमप्राप्त ठरते.

हया उलट उत्तरवादी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे तर्फे प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे असा युक्तीवाद करण्यात आला की, सदरची संस्था ही सहकारी सोसायटी किंवा पब्लिक ट्रस्ट

असल्यामुळे माहितीचा अधिकार २ (एच) नुसार पब्लिक ॲथॉरिटी या व्याख्येत बसत नाही. तसेच सदर संस्थेला सरकार कडुन कुठल्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य मिळत नसुन भारतीय संविधानानुसार किंवा कोणत्याही परिपत्रकानुसार किंवा आदेशानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापीत झाली नसल्यामुळे त्यांना माहिती अधिकाराच्या तरतुदी लागु नाही, त्यामुळे माहिती पुरविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसे त्यांनी त्यांच्या म्हणण्याचा आधार निकाल पृष्ठार्थ २००९ (३) एम.एल.जे. पान नंबर ३६४ पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप, बँक यांचे विरुध्द कमिशनर विदर्भ रिजन, नागपुर या प्रकरणात मा.उच्च न्यायालय, नागपुर खंडपिठाने दिलेल्या निर्णयाचा हवालानुसार सदरची संस्था ही पब्लिक ॲथारीटीच्या संज्ञेत बसत नाही असे म्हटले आहे. तसेच हया प्रकरणात व्दितीय अपिलात सुनावणी घेण्यात आली आहे व प्रथम अपिलाच्या बाबी त्यांना निदर्शनास आणुन दिल्या. जन माहिती अधिकारी यांनी त्यांची संस्था ही पब्लिक ॲथॉरीटीच्या व्याखेत बसत नाही त्या सर्व बाबी हया आयोगासमोर मांडल्यात व सदर निकालाचा हवाला देवुन व रिट पिटीशन नं. ८३८२/०८ वैनगंगा सहकारी साखर कारखाना लिमीटेड विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर हया प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर २००९ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत या आयोगासमोर दाखल केली हया आयोगाने वरील दोन्ही निवाडयाच्या निकालाच्या प्रतीचे अवलोकन केले असता हया आयोगाचे असे मत आहे की, सदर निवाडा हा सहकारी संस्थेच्या बाबतीत असुन महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० नुसार कार्यरत असेल त्यासंबंधी आहे. डॉ.पंजाबराव देशमुख, अर्बन को-ऑप. बँक, विरुध्द स्टेट इन्फॉरमेशन कमिशनर, नागपुर हया निकालाचे अवलोकन केले असता सदरची संस्था ही सहकारी संस्था असुन त्यांनी निर्माण केलेले उपविधीनुसार स्थापन झालेली आहे. सहकारी कायदा महाराष्ट्र सहकार अधिनियम १९६० नुसार पंजीबध्द झालेले आहे व त्याच आधारावर याचिका क्र.८३८२/०८ ही संस्था वैनगंगा साखर कारखाना सुध्दा स्थापन झालेले आहे त्यामुळे ॲड.राठी यांनी सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती यांचे तर्फे केलेला युक्तीवाद मान्य करण्यात येत नाही. कारण कृषी उत्पन्न बाजार समिती ही संस्था जरी सहकारी संस्था असली तरी ही संस्था महाराष्ट्र राज्य कृषी खरेदी विक्री अधिनियम १९६३ च्या कायदयान्वये अस्तित्वात आलेली संस्था आहे व त्यामुळे जर एखादी संस्था ही राज्य विधीमंडळाने पारित केलेल्या कायदयानुसार अस्तित्वात आली असेल तर अशा संस्था माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसते. तसेच पणन संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २१ नोव्हेंबर २००५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने जो आदेश काढलेला आहे त्यात कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई व राज्यातील इतर बाजार समित्या यांचा उल्लेख करुन त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत असल्यामुळे त्यांनी त्यांचे माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी नेमणे आवश्यक आहे. या बाबी लक्षात घेता कृषी उत्पन्न बाजार समिती, दिग्रस, जि.यवतमाळ ही संस्था माहिती अधिकाराच्या व्याख्येत बसत असुन सदर संस्थेला माहिती अधिकाराच्या तरतुदी लागु होतात असा या आयोगाने निष्कर्ष काढलेला आहे. दोन्ही प्रकरणात सुनावणी घेवुन खालील आदेश पारीत करण्यात येते.

**आदेश**

१. सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, दिग्रस यांनी अर्जदाराला दि.११/११/२००९ च्या प्रपत्र 'अ' नुसार हा आदेश मिळाल्यापासुन १५ दिवसाचे आंत विनाशुल्क माहिती पुरवावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २०२ / २०१०**
**अपिल क्र. २०३ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.सिद्यीकभाऊ सुपडु,
रा.सायकलपुरा, मलकापुर, ता.मलकापुर,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, बुलडाणा, जि.बुलडाणा.
**२.**जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, अली-अलाना, उर्दु हायस्कुल,
सालीपुरा, मलकापुर, ता.मलकापुर,
जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा श्री.एस.ए.सोनुने हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अली-अलाना, उर्दु हायस्कुल, मलकापुर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे ॲड.श्री.राजेंद्र पांडे हे हजर आहेत.

अपिल क्रमांक २०२ व अपिल क्रमांक २०३ हया दोन्ही प्रकरणात अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल केले व त्यात प्रपत्र अ नुसार माहिती अद्याप मिळाली नाही असे म्हटले आहे. तसेच सदर दोन्ही प्रकरणात अर्जदाराने प्रपत्र ब नुसार दि.१३/०१/२०१० रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीस मुख्याध्यापक व उत्तरवादी हे गैरहजर होते.

तरी, शेवटची संधी म्हणुन अर्जदार व उत्तरवादी यांना प्रथम अपिलात दिनांक १३/१२/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता सदरच्या प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी हे सुनावणी घेतील. जन माहिती अधिकारी यांचे वतिने वकील हजर असल्यामुळे त्यांना नोटीस काढण्याची आवश्यकता नाही. परंतु अर्जदाराला दोन्ही प्रकरणात आगावु नोटीस पाठवुन सुनावणीस हजर राहण्याकरिता कळवावे. त्यानंतर अर्जदार गैरहजर राहील्यास प्रथम अपिलीय अधिकारी नियमानुसार आदेश पारीत करतील. त्याची प्रत अर्जदाराला देतील व माहिती उपलब्ध करुन देतील व तसेच जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपिलाच्या प्रती पुरविण्याचे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधीने कबुल केले आहे त्यानुसार जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपिलाच्या प्रती अपिलीय अधिकारी झेरॉक्स करुन देतील. अर्जदार यांचे वकील श्री.पी.वाय. खान हे उशिरा हजर झालेत व त्यांना प्रथम अपिलाची सुनावणीची तारीख व वेळेबाबत अवगत करण्यात आले.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.२०५ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.महादेव किसनराव निमकर,
सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिवाजी चौक,
दारव्हा, मु.पो.ता. दारव्हा, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सचिव, श्री.शिवाजी शिक्षण संस्था,
अमरावती, जि.अमरावती

२.जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका, कन्या शाळा,
आंजी (मोठी) जि.वर्धा.

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.महादेव किसनराव निमकर हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे मुख्य लिपीक, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती श्री.अनवर लतीफ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कन्या शाळा, आंजी श्रीमती आर.एस. रेचे हया हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक २८/०५/२००९ रोजी मुख्याध्यापिका, कन्या विद्यालय, आंजी यांचेकडे अर्ज करुन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या वर्ग ५ ते १२ च्या घेतलेल्या घटक चाचण्या व सत्रांत परिक्षेकरीता झालेला खर्च व त्या वर्षातील प्रभारीच्या नांवासह माहिती मागितली. सदरची माहिती ही दिनांक ०७/०८/२००९ ला अर्जदाराला पोष्टाने पाठविलेली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदरची माहिती मिळाली नाही. तरी जी माहिती दिनांक ०७/०८/२००९ रोजी पाठविण्यात आली आहे त्या माहितीची प्रत या आयोगासमोर अर्जदारास देण्यात आली आहे. अर्जदाराने हया आयोगासमोर असे सांगितले की, माहिती रजिष्टर पोष्टाने पाहीजे कारण साध्या पोष्टाने माहिती पाठविल्यामुळे मिळाली नाही. तरी त्याकरिता अर्जदाराने ३० रु. मनिऑर्डरने मुख्याध्यापिका यांचेकडे पाठवावे व पैसे मिळाल्यानंतर ८ दिवसांत माहिती अर्जदाराच्या पत्त्यावर पाठवावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २०९ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.महादेव किसनराव निमकर,
सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिवाजी चौक,
दारव्हा, मु.पो.ता. दारव्हा, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कोषाध्यक्ष, श्री.शिवाजी शिक्षण संस्था,
अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, श्री.शिवाजी शिक्षण संस्था,
अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २०/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे श्री.महादेव किसनराव निमकर हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे मुख्य लिपीक, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती श्री.अनवर लतीफ हे हजर आहेत.

सदर प्रकरणात शिवाजी शिक्षण संस्था, तथा उत्तरवादी यांनी अर्जदार यांना मागितलेली माहिती ३० वर्ष जुनी असल्याने माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविण्याची शक्यता नाही व माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती देण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच सन १९९१-९२ या वर्षातील अहवालाचा शोध घेवुन माहिती सापडल्यास किंवा न सापडल्यास अर्जदाराला तसे लेखी कळवावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**